# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.03.2025** **वार- सोमवार**

---

**अर्थसंकल्प**

राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला. नवीन औद्योगिक धोरण, तसंच कामगार, गृहनिर्माण, जलप्रवास, आरोग्य आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी धोरण करणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. उद्योग, पायाभूत सुविधा, कृषि आणि संलग्न क्षेत्रे, सामाजिक तसंच इतर क्षेत्राच्या विकासासाठी यात महत्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या 3 टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यातही शासन यशस्वी ठरलं आहे. तसंच राज्याची महसुली तूट सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या 1 टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे. 2025-26 ची राजकोषीय तूट 1 लाख 36 हजार 235 कोटी रुपये आहे.

**फुले स्मृतीदिन**

स्त्री शिक्षणाचा पाया रचणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज ठीकठिकाणी त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर सुरेश गोसावी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**हर्षवर्धन पाटील**

ऊस शेती क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर क्रांतिकारक ठरेल, असं प्रतिपादन राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी नुकतंच पुण्यात केलं. पाटील यांनी नुकतीच बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्राला भेट दिली; या ठिकाणी मायक्रोसॉफ्ट आणि ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या सहकार्यानं कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेल्या ऊस शेती क्षेत्राचीही त्यांनी पाहणी केली; त्यानंतर राज्यातील काही शेतकऱ्यांशी त्यांनी ऑनलाईन संवाद साधला. ऊस शेती क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पाणी आणि खतांची बचत होऊन सुमारे चाळीस टक्के उत्पादन वाढ होत असल्याचं प्रयोगाने सिद्ध झालं आहे, असं पाटील यांनी सांगितलं.

**रवींद्र धंगेकर**

काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी कॉंग्रेसच्या पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. आज पुण्यात पत्रकार परिषदेत त्यांनी याबाबत माहिती दिली. गेल्या 10-12 वर्षांपासून कॉंग्रेस पक्षाबरोबर काम करत असून पक्ष सोडताना दु:ख हॉट आहे, असं धंगेकर म्हणाले. नवीन पक्ष प्रवेशाबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज संध्याकाळी भेट घेणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं दोन दिवस वाहनमुक्त शहर उपक्रम साजरा करण्यात आला. यानिमित्त रस्ते सुरक्षा, पर्यावरण रक्षण, पादचारी मार्गिका, सायकल मार्गिका, सार्वजनिक वाहतूक आणि यामध्ये नागरिकांचा सहभाग अशा विविध विषयांवर चर्चासत्र घेण्यात आली. या निमित्तानं सांस्कृतिक कार्यक्रमही घेण्यात आले.

**कल्याण गंगवाल**

शाकाहाराचे पुरस्कर्ते डॉक्टर कल्याण गंगवाल यांना पुण्यात नुकत्याच झालेल्या पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सवात अहिंसा करुणा रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. सारस्वताचार्य श्री देवनंदी आचार्य गुरुदेव यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती. डॉक्टर गंगवाल यांनी सर्वजीवमंगल प्रतिष्ठानच्या माध्यमातून शाकाहाराच्या प्रचार आणि प्रसाराचं कां केलं असून अनेक ठिकाणी असलेली पशू बलिदानाची प्रथा बंद करण्यात पुढाकार घेतला आहे.

**स्त्रीशक्ती**

जागतिक महिला दिनाच्या निमित्तानं पुण्यात शास्त्रीय संगीतातील बंदिशींच्या माध्यमातून भारतीय परंपरेतील स्त्री शक्तीचा जागर करण्यात आला. भक्तिसुधा फाऊंडेशनच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात भारतमातेवरील विशेष बंदिश तसंच देवी सीतामाता, राजमाता जिजाऊ, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पत्नी यमुनाबाई सावरकर, संत मुक्ताबाई, झाशीची राणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन कार्याची महती सांगणाऱ्या बंदिशीचं गायन नामवंत गायिकांनी केलं. कीर्तनकार मानसी बडवे यांनी ही संकल्पना निरुपणाद्वारे मांडली. कार्यक्रमाची संकल्पना गायिका भाग्यश्री केसकर आणि आशिष केसकर यांची होती, या कार्यक्रमात तबल्याची साथ सावनी तळवलकर तर हार्मोनियमची साथ सुप्रिया जोशी यांनी केली.

**अमली पदार्थ**

नशा येणाऱ्या औषधांची विक्री करणाऱ्या दोन तरुणांना हडपसर पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून औषधांच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत. तरूण पिढीमध्ये नशेसाठी औषधांचा वापर करण्याचे प्रकार वाढीला लागले आहेत. अमली पदार्थांचं सेवन परवडत नसल्याने अनेक तरुण नशेसाठी औषधांचा वापर करत असल्याचं दिसून आलं आहे. अशा प्रकारच्या औषधांचे सेवन केल्यास आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम होऊ शकतो, अशी माहिती पोलिसांनी दिली.

**उष्माघात**

राज्यात उन्हाची तीव्रता वाढू लागली असून उष्माघाताच्या चार रुग्णांची राज्यात नोंद झाली आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागाने तातडीने उपाययोजना सुरू केल्या आहेत. सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये उष्णतेशी संबंधित आपत्कालीन उपचारांसाठी विशेष कक्ष उभारण्यात आले आहेत. नागरिकांनी उन्हात बाहेर पडताना योग्य काळजी घ्यावी असं आवाहन आरोग्य विभागाने केलं आहे. 2023 मध्ये 3 हजार 199 जणांना उष्माघाताचा त्रास झाला आणि 14 जणांचा मृत्यू झाला. तर गेल्या वर्षी 347 जणांना उष्माघाताचा त्रास होऊन एकाचा मृत्यू झाला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 37 तर किमान 16 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्या तापमानात आणखी थोडी वाढ होण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**